गांवकरी
www.gavakari.net
18 Jul 2025 - Page 9

संक्षिप्त

## के. के. वाघतर्फे शनिवारी प्रवेशप्रक्रियेवर चर्चासत्र

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकीच्या वतीने अभियांत्रिकी व कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी, नियम व प्रवेशप्रक्रिया या विषयावर शनिवार, दि. १९ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता रावसाहेब थोरात सभागृह, नाशिक येथे मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अभियांत्रिकी व कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी, नियम व प्रवेशप्रक्रिया याबाबत अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जी. बी. दाभाडे मार्गदर्शन करणार आहेत. हे चर्चासत्र विनामूल्य आहे. यासाठी जास्तीत जास्त पालक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक मा. अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले आहे.